# येत्या रविवारी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांचा जनता दरबार

## नागरिकांनी समस्या मांडाव्यात - पालकमंत्री कार्यालयाचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.१९ सप्टेंबर:** राज्यमंत्री गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार आणि खनीकर्म तसेच भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांचा पहिला जिल्हास्तरीय जनता दरबार येत्या रविवार, २१ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता ते दुपारी २ वाजेपर्यंत पोलीस मुख्यालयातील ड्पोलीस बहुउद्देशीय सभागृह, भंडारा येथे आयोजित करण्यात आला आहे.



या दरबारात जिल्ह्यातील सर्व खासदार, आमदार यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख उपस्थित राहणार असून नागरिकांना त्यांच्या समस्या, अडचणी किंवा निवेदने थेट पालकमंत्री महोदयांसमोर मांडण्याची संधी मिळणार आहे.

**तहसीलस्तरीय जनता दरबारांना उत्स्फूर्त प्रतिसाद**

पालकमंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. भोयर यांनी जिल्ह्यात दर सोमवारी तहसील पातळीवर जनता दरबार आयोजित करण्याचा निर्णय घेतला होता.

त्यानुसार ८ सप्टेंबर व १५ सप्टेंबर रोजी तहसील पातळीवरील जनता दरबार यशस्वीरीत्या पार पडले. या दोन जनता दरबारांत मिळून एकूण ४२८ तक्रारी व निवेदने नोंदविण्यात आली. यातील २५१ प्रकरणे तत्काळ मार्गी लावण्यात आली असून उर्वरित प्रकरणांचा संबंधित विभागांकडून वेगाने पाठपुरावा सुरू आहे. नागरिकांनी दिलेल्या प्रतिसादामुळे या उपक्रमाला लोकाभिमुख स्वरूप लाभले आहे.

**जिल्हा प्रशासनाची तयारी**

आगामी जिल्हास्तरीय जनता दरबाराच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी सावन कुमार यांनी सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेऊन जनता दरबाराच्या तयारीचा आढावा घेतला. विविध विभागांना आवश्यक सूचना देऊन नागरिकांच्या समस्यांवर जलद कार्यवाही करण्याचे निर्देश दिले गेले आहेत.

**नागरिकांसाठी आवाहन**

पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी जिल्ह्यातील जनतेशी थेट संवाद साधून प्रश्न सोडविण्याचा संकल्प केला आहे. त्यासाठी नागरिकांनी आपले निवेदने लेखी स्वरूपात तयार करून या जनता दरबारात उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासन व पालकमंत्री कार्यालयाने केले आहे.

# साकोलीत एका रात्रीत पाच दुकाने फोडली

## व्यापाऱ्यांत भीतीचे वातावरण

**महासागर प्रतिनिधी**
**साकोली दि.१९ सप्टेंबर:** साकोली शहरात पुन्हा एकदा भुरट्या चोरांचा धुमाकूळ पाहायला मिळाला. १९ सप्टेंबरच्या मध्यरात्री प्रगती कॉलनी चौक, नर्सरी कॉलनी व जुन्या पंचायत समिती परिसरातील पाच दुकानांची शटर फोडून अज्ञात चोरट्यांनी तब्बल २३,५०० रुपयांची रोकड लंपास केली. यामध्ये पेंट दुकान, मेडिकल व किराणा दुकाने अशी विविध ठिकाणे चोरट्यांनी टार्गेट केली.

या घटनेत साईराम ट्रेडर्समधून २,००० रुपये, गायत्री मेडिकल मधून १०,००० रुपये, आदित्य जेनरिक मेडिकलमधून ७,००० रुपये, अन्नपूर्णा किराणा दुकानातून १,००० रुपये तर अग्रवाल किराणा दुकानातून ३,५०० रुपये असा ऐवज



चोरट्यांनी उचलला. विशेष म्हणजे व्यापाऱ्यांनी पोलिसांत अधिकृत तक्रार नोंदवलेली नसल्याने तपासाची दिशा धूसर झाली आहे. याआधी ८ सप्टेंबर रोजी तब्बल १.५० लाखांची रोकड गाडीतून चोरीस गेल्याची घटना अद्याप सुटलेली नाही. सलग चोरीच्या घटनांनी व्यापारी वर्गात प्रचंड भीती व संतापाचे वातावरण आहे. पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, व्यापाऱ्यांकडून तक्रारी न आल्याने चोरांचे मनोबल अधिकच वाढले आहे. शहरवासीयांनी आता पोलिस प्रशासनाकडून कडक कारवाईची मागणी केली आहे.

### पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांचा रविवारी जिल्हा दौरा

भंडारा : राज्यमंत्री सहकार व खनिकर्म तथा पालकमंत्री भंडारा जिल्हा डॉ.पंकज भोयर हे रविवार दिनांक २१ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हा दौरावर येणार आहेत. सकाळी नागपूरवरून भंडाऱ्यात आगमन होईल. सकाळी ११ ते दुपारी २ दरम्यान पोलिस मुख्यालय येथे आयोजित पालकमंत्री जनता दरबार कार्यक्रमास उपस्थित राहतील. त्यानंतर दुपारी २ ते ३ वेळ राखीव. दुपारी ३ वाजता शासकीय वाहनाने गोसेखुर्द प्रकल्प येथे आगमन व भेट सोईनुसार नागपूरकडे प्रयाण व राखीव.

# राज्याचे माजी मंत्री ज्येष्ठ आ. जयंत पाटील यांच्यावर गोपीचंद पडळकर यांनी केलेल्या अश्लाघ्य भाषेचा तीव्र शब्दांत निषेध



**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.१९ सप्टेंबर:** राज्याचे माजी सन्माननीय मंत्री तथा ज्येष्ठ आमदार श्री. जयंत पाटील साहेबांवर गोपीचंद पडळकर यांनी केलेल्या अश्लाघ्य भाषेचा आम्ही तीव्र शब्दांत निषेध करतो.

या निषेध आंदोलनाचे नेतृत्व माजी आमदार तथा जिल्हाध्यक्ष चरण भाऊ वाघमारे यांनी केले.

फोटो ला चप्पल मारून, चिखल फासून निषेध नोंदविण्यात आला. या प्रसंगी जिल्ह्याचे सर्व मान्यवर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवर पदाधिकारी जिल्हा सरचिटणीस गौरव नवरखेले, विनोद वटी जिल्हा उपाध्यक्ष, ऊर्मिलाताई आगाशे महिला जिल्हाध्यक्ष , राणी ताई ढेंगे सेवादल जिल्हाध्यक्ष , चंद्रशेखर भिवगडे युवक जिल्हाध्यक्ष, नितेश मारवाडे सोशल मिडिया जिल्हाध्यक्ष , बालचंद बोंद्रे ग्राहक संरक्षण विभाग जिल्हाध्यक्ष , सचिन बडवाईक अध्यात्मिक आघाडी जिल्हाध्यक्ष , हरिश्चंद्र धकाते ज्येष्ठ नागरिक सेल जिल्हाध्यक्ष , विजय रहांगडाले सर वाहतूक आघाडी जिल्हाध्यक्ष गितेश ठोंबरे, सिंधी समाज जिल्हाध्यक्ष योगेश रंगवाणी, बांधकाम व्यावसायिक जिल्हाध्यक्ष महादेव बुरडे, मोहाडी तालुकाध्यक्ष हंसराज आगाशे भंडारा शहराध्यक्ष मधुकर चौधरी तुमसर शहराध्यक्ष हेमराज नागफासे जिल्हा सचिव मेहताबसिंग ठाकूर, विश्वनाथ कुकडे, बाला वाडीभस्मे, गुरुदेव सेलोकर, महेश कळंबे, मधुकर पटले, शामराव साठवणे आणि मोठ्या संख्येने पदाधिकारी निषेध नोंदविण्यासाठी उपस्थित होते.

# धर्मेंद्र कोचे राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**महासागर प्रतिनिधी**
**साकोली दि.१९ सप्टेंबर:** सन २०२४-२५ च्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी शिक्षकांची अंतिम निवड करण्यासाठी दिनांक २५ ऑगस्ट २०२५ समितीची बैठक झाली राज्य निवड समितीने शिक्षकांची गुणानुक्रमे प्रवर्गनिहाय निवड यादी शासनात सादर केली त्यानुसार क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार घोषित करण्यात आला .

भंडारा जिल्ह्यासाठी माध्यमिक विभागातून श्री धर्मेंद्र लक्ष्मणराव कोचे मुख्याध्यापक पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल साकोली यांची निवड करण्यात आली . यामध्ये सन २०२२ पासून पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल साकोली येथील मुख्याध्यापकाची धुरा सांभाळणारे श्री धर्मेंद्र कोचे-सर यांनी आपली विविध छाप उपक्रमाद्वारे शाळेमध्ये सोडली व शाळेची गुणवत्ता व विद्यार्थी पटसंख्या वाढवण्याचा ध्यास धरून या शाळेला एक



नावलौकिक मिळवल्याबद्दल त्यांना राज्य आदर्श शिक्षक आणि सन्मानित करण्यात आले. या अनुषंगाने पंचायत समिती विभागाचे शिक्षण विस्तार अधिकारी श्री हरीषजी भलावी व पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल साकोली येथील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री हुसन केवलराम बडोले तथा उपाध्यक्ष सौ.ममताताई डडेमल ,श्री उद्धवजी निखारे,श्री. मंगेश जी राऊत, वनेश पारधी, राजहंस गहाणे, रेशमा ताई चव्हाण, सौ. छायाताई टेकाम, रश्मीताई पटले वंदना वाढीवा, श्री मनोहर भैसारे श्री बी. आर चव्हाण डॉ. मनोज बागडे ,धनराज मसराम, श्री इमरान तुरक मुकेश गुरनुले, कुमारी पल्लवी शिंदे श्री अमित डोये सर्व सदस्य गण यांच्या उपस्थितीत होते.

# मांडवी ग्रामपंचायत भवन जीर्ण : प्रशासनाचे दुर्लक्ष

## सरपंच मनीषा ढबाले यांचा पुढऱ्यांना गावबंदीचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**
**सिहोरा दि.१९ सप्टेंबर:** तुमसर पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या मांडवी (सि.) गावातील ग्रामपंचायतीची इमारत गेल्या अनेक वर्षांपासून जीर्ण झाली असून, पावसाळ्यात गावकऱ्यांचे आणि कर्मचाऱ्यांचे अतोनात हाल होत आहेत. इमारतीची दुरवस्था आणि जनप्रतिनिधी व प्रशासनाचे याकडे होत असलेले कमालीचे दुर्लक्ष पाहता, संतप्त झालेल्या सरपंच मनीषा ढबाले यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जोपर्यंत नवीन इमारत मंजूर होत नाही, तोपर्यंत गावात कोणत्याही पुढारी किंवा जनप्रतिनिधींना प्रवेश दिला जाणार नाही, असा सडेतोड इशाराच त्यांनी दिला आहे.



**जीर्ण इमारत बनली आहे डोकेदुखी :** मांडवी (सि.) ग्रामपचायतीची सध्याची इमारत अनेक वर्षापूर्वी बांधण्यात आली होती. काळाच्या ओघात ही इमारत पूर्णपणे जीर्ण झाली असून, भिंतींना तडे गेले आहेत, तर छताचे पत्रे गळू लागले आहेत. विशेषतः पावसाळ्यात परिस्थिती अधिकच बिकट होते. ग्रामपंचायतीच्या कार्यालयात ठिकठिकाणी पाणी गळते, त्यामुळे महत्त्वाचे दस्तऐवज आणि कागदपत्रे सुरक्षित ठेवणे अवघड झाले आहे. कर्मचाऱ्यांना आणि कामासाठी येणाऱ्या गावकऱ्यांना एका कोपऱ्यात उभे राहून काम करावे लागते. जनप्रतिनिधींना व प्रशासनाकडे वारंवार मागणी करूनही दुर्लक्ष केला जात आहे. सरपंच मनीषा ढबाले यांनी या समस्येबाबत अनेकदा प्रशासनाकडे पाठपुरावा केला आहे. नवीन इमारतीसाठी अनेक अर्ज दिले, निवेदने सादर केली, पण प्रत्येक वेळी त्यांना केवळ आश्वासने मिळाली. आजपर्यंत ठोस कार्यवाही झालेली नाही. प्रशासनाच्या या उदासीन धोरणामुळे गावातील विकासका मांवरही परिणाम होत असल्याचे सरपंच ढबाले यांनी सांगितले.

**पुढऱ्यांना गावबंदीचा कडक इशारा :**

'गावातील ही मूलभूत समस्या असूनही जनप्रतिनिधी आणि प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत,' असे संतप्तपणे सांगत सरपंच मनीषा ढबाले यांनी आपला रोष व्यक्त केला. 'आम्ही अनेक वर्षांपासून नवीन इमारतीची मागणी करत आहोत, पण कोणीही लक्ष देत नाही. आता आमचा संयम संपला आहे. जोपर्यंत नवीन ग्रामपंचायत इमारतीसाठी निधी मंजूर होत नाही आणि कामाला सुरुवात होत नाही, तोपर्यंत कोणत्याही पुढारी किंवा जनप्रतिनिधीला गावात प्रवेश दिला जाणार नाही. त्यांच्या सभा किंवा भेटीला आम्ही गावकरी विरोध करू,' असा निर्वाणीचा इशारा त्यांनी दिला आहे. मांडवी ग्रामस्थांनीही सरपंचांच्या भूमिकेला पाठिंबा दर्शवला असून, लवकरच यावर काही निर्णय न झाल्यास मोठे आंदोलन उभे करण्याचा निर्धार त्यांनी केला आहे. या गंभीर समस्येमुळे गावातील वातावरण तणावपूर्ण झाले असून, आता प्रशासन यावर काय पाऊल उचलते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' आरोग्य शिबिर २३ सप्टेंबरला साकोलीत

**महासागर प्रतिनिधी**
**साकोली दि.१९ सप्टेंबर:** महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग वतीने 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' अंतर्गत येत्या मंगळवार २३ सप्टेंबरला उपजिल्हा रुग्णालय साकोली येथे आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर शिबिराचा जास्तीत जास्त महिलांनी घ्यावा असे आवाहन वैद्यकीय अधीक्षक ( प्रभारी ) डॉ. भास्कर गायधने यांनी केलेले आहे.

केंद्र शासन व महाराष्ट्र शासन आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाद्वारे संपूर्ण भारतभर हे शिबिर आयोजित होत आहे. मंगळवार २३ सप्टेंबरला स. १० पासून साकोली उपजिल्हा रुग्णालयात होणाऱ्या



शिबिरामध्ये विविध आरोग्य सेवा पुरवल्या जातील, ज्यात महिलांची तपासणी, उच्च रक्तदाब, मधुमेह, तोंडाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगासाठी तपासणी केली जाईल. जोखीम असलेल्या महिलांसाठी क्षयरोग (Tuberculosis) तपासणी. किशोरवयीन मुली आणि महिलांसाठी ॲनिमिया (रक्तक्षय) तपासणी आणि समुपदेशन. आदिवासी भागातील महिलांसाठी सिकलसेल तपासणी कार्ड वाटप आणि समुपदेशन. गर्भवती महिलांसाठी प्रसूतिपूर्व काळजी (ANC) तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी, तसेच पोषण आणि काळजी यावर समुपदेशन. बालकांचे लसीकरण, किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी स्वच्छता आणि पोषणाविषयी समुपदेशन सत्रे. पंतप्रधान जन आरोग्य योजना (PMJAY) अंतर्गत नोंदणी, आयुष्मान वय वंदना कार्ड वाटप. क्षयरोग निर्मुलनासाठी निक्षय मित्र स्वयंसेवकांची नोंदणी केली जाईल. शिबिरांच्या सर्व सहभागींची ऑनलाइन नोंदणी करणे, ज्याच्याकडे आयुष्मान भारत हेल्थ अकाउंट (ABHA), PMJAY चे कार्ड नाही, आयुष्मान वय वंदना योजना यात नोंदणी नसलेल्या सर्व लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात येणार आहे. असा कार्यक्रम आयोजित केला आहे.

सदर आरोग्य शिबीराचा शहरी व ग्रामीण भागातील जास्तीत जास्त महिलांनी व कुटुंबीयांनी घ्यावा असे आवाहन उपजिल्हा रुग्णालय साकोली प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. भास्कर गायधने यांनी केलेले आहे.

# श्रीमती रेवाबेन मनोहरभाई पटेल महिला कला महाविद्यालय, येथे भूगोल विभागातर्फे जागतिक ओझोन दिन साजरा

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.१९ सप्टेंबर:** स्थानीय श्रीमती रेवाबेन मनोहरभाई पटेल महिला कला महाविद्यालय, भंडारा येथे भूगोल विभागातर्फे जागतिक ओझोन दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंजना श्रृंगारपूरे होत्या. प्रमुख अतिथी प्रा. डॉ नरेश बोरकर सर यांनी मार्गदर्शन केले.

प्राचार्या डॉ. श्रृंगारपूरे यांनी प्रतिपादन केले की, भावी पिढी करीता ओझोन थराचे संरक्षण करणे काळाची गरज आहे . ओझोन क्षयामुळे सजीव सृष्टी वर विपरित परिणाम होत असतो.




या कार्यक्रमाची प्रास्ताविक रासयो अधिकारी व भूगोल विभाग प्रमुख डॉ . कैलास ईश्वरकर सर यांनी केले .या कार्यक्रमाचे संचालन कु . यामीनी सातपैशे तर आभार प्रा. सुभाष पाथोडे सर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. श्वेता वेगड, प्रा. सुषमा , प्रा . राहुल रामटेके प्रा . ज्योती सारंगपुरे . बंसीलाल शेंडे यांनी सहकार्य केले. प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व महाविद्यालयातील विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# गावाच्या सर्वांगीण विकासासाठी नागरिकांनी अभियानात सहभागी व्हावे : सविता ठाकरे

**महासागर प्रतिनिधी**
**जांब(लोहारा)दि.१९ सप्टेंबर:** शासनाच्या वतीने अनेक लोक कल्यानकारी योजना गावाच्या विकासासाठी अभियानाच्या माध्यमातुन राबवत असतो. मात्र लोकसहभागा शिवाय त्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचत नाही. त्यामुळे आजपासून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरु होत असुन आपल्या गावाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण काम करण्याची प्रत्येकाना संधी मिळणार असून यातुन गावाच्या विकासाची गती मिळणार आहे. त्यामुळे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी नागरिकांनी लोकसहभागातुन अभियानात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन सरपंच सविता अरविंद ठाकरे यानी कार्यशाळेला मार्गदर्शनावेळी केले.

तुमसर तालुक्यातील लोहारा येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची गावस्तरिय कार्यशाळा सरपंच सविता अरविंद ठाकरे याच्या



अध्यक्षतेखाली घेण्यात आली. याअभियाना अतर्गत ग्रामपंचायतीचा सर्वांगिण विकासासह अभियानामध्ये समाविष्ट असलेल्या सर्व विकास कामाची माहिती उपस्थित ग्रामस्थांना देण्यात आली. ग्रामपंचायतीच्या विकास कामांचे मूल्यांकन

करून उत्कृष्ट विकास कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतीला शासनातर्फे पारितोषिक देण्यात येणार आहे. त्यामुळे गावकर्यांनी आपल्या गावाला पुरस्कार मिळवुन देण्यासाठी या अभियानात सहभागी होवून यशस्वी करावे असे ग्रामपंचायत अधिकारी विनोद पटले यानी सागितले. या कार्यशाळेला सरपंच सविता अरविंद ठाकरे, उपसरपंच आशिष ब्रम्हनोटे, ग्रामपंचायत सदस्य फागोलाल पिपरधारे, रामचद्र नेवारे, सुखदेव ईळपाचे, ग्रामपंचायत सदस्या विशाखा घोडीचोर, योगिता दुनेदार, नलु शिवरकर, शालु ढोगे, वर्षा भर्रे, पोलिस पाटिल हरिष डोंगरे, ग्रामपंचात अधिकारी विनोद पटले, अगणवाडी सेविका रेखा लेदे ,अरविंद ठाकरे , संगणक चालक हेमंत उचिबगले ,ग्रामपंचायत कर्मचारी शैलेश माकडे , व गावातील पदाधिकारी, गावकरी मोठ्या सख्येने उपस्थित होते.

# ओबीसी विद्यार्थ्यासाठी वसतीगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयं योजना प्रवेशासाठी अर्ज स्वीकृती

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.१९ सप्टेंबर:** शैक्षणिक सत्र २०२५-२६ करिता इतर मागास प्रवर्गातील मुला/ मुलींसाठी शासकीय वसतिगृह प्रवेशाची ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यानुसार इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत मुलां-मुलींच्या शासकीय वसतिगृहांमध्ये तसेच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयं योजना अंतर्गत प्रवेश घेता येणार आहे.

१२ वी नंतरच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या (बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) विद्यार्थ्यांनी शासनाच्या https://hmas.mahait.org या ऑनलाईन पोर्टलवर दि. २९ सप्टेंबर २०२५ पर्यंत अर्ज भरून, त्याची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे संबंधित वसतिगृहात विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील वसतिगृहासाठी पात्र असलेल्या, तथापि क्षमतेअभावी वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज पंडित दिनदयाल स्वयं योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना अंतर्गत विचारात घेतले जातील.

शासकीय वसतिगृह उपलब्ध नसलेल्या जिल्ह्यांसाठी फक्त स्वयं योजना व आधार योजना याकरिता अर्ज ऑनलाईन भरून, अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे दि. २९ सप्टेंबर २०२५ पर्यंत विहीत मुदतीत संबंधित कार्यालयात सादर करावीत. अधिक माहितीसाठी इमाव, विमाप्र व विजाभज मुला-मुलींचे शासकीय वसतिगृह, भंडारा येथील गृहपाल तसेच सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, भंडारा यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, भंडारा यांनी केले आहे.

**कोर्ट विद्यमान तहसिलवार तथा तालुका दंडाधिकारी, साकोली यांचे कार्यालय मौजा साकोली प.ह.नं.दिनांक १५/९/२०२५**

**-जाहिरनामा-**

**कु. ललिता छन्नालाल पांडे रा. साकोली ता. साकोली जि. भंडारा**
**(सासरचे नाव- कु. ललिता धर्मेंद्र सोनेकर रा. भंडारा)**
**विरुध्द**
**मुख्याधिकारी, (जन्म-मृत्यु नोंदणी) न.प. कार्यालय, साकोली**

ज्याअर्थी अर्जदार कु. ललिता छन्नालाल पांडे रा. साकोली ता. साकोली जि. भंडारा (सासरचे नाव कु. ललिता धर्मेंद्र सोनेकर रा. भंडारा येथील रहिवासी असून अर्जदार त्यांनी त्यांचे स्वतःचे जन्म मौजा साकोली ता. साकोली जि. भंडारा येथे दिनांक ०५/०९/१९८८ ला झालेला असल्याने त्यांनी न.प. कार्यालय, साकोली येथे जन्माची नोंद घेण्यासाठी जन्म व मृत्यु अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अंतर्गत कायदेशीर जन्माची नोंद घेऊन प्रमाणपत्र मिळण्याकरिता या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे आणि ज्याअर्थी उक्त जन्माची नोंद घेऊन प्रमाणपत्र देण्याचे योजिले आहे. त्याकरिता दिनांक **१७/१०/२०२५** ही पेशी तारीख सुनावणीसाठी निश्चीत करण्यात आली असून सुनावणी तहसिल कार्यालय, साकोली येथे सकाळी ११.०० वाजता करण्यात येणार आहे. त्याअर्थी याव्दारे जाहीर करण्यात येते की, ज्या कोणाचे कु. ललिता छन्नालाल पांडे रा. साकोली याचे जन्माची नोंद मौजा साकोली येथील न.प. साकोली ता. साकोली जि. भंडारा येथे जन्माची नोंद करण्यासंबंधाने कुणास हरकत / आक्षेप सादर करावयाचे असेल तर त्यांनी स्वतः जातीने किवा अभिकर्ता यांचे मार्फत जाहीरनामा प्रकाशित होण्याचे तारखेपासुन ०१ महिण्याचे आत सदर न्यायालयात हजर राहून उजर तक्रार / आक्षेप अर्ज सादर करावे. विहीत मुदतीत उजर तक्रार / आक्षेप न कळविल्यास संबंधित वरील क. ललिता छन्नालाल पांडे रा. साकोली ता. साकोली जि. भंडारा यांचे जन्माची नोंद घेऊन तसे प्रमाणपत्र देण्यासाठी संबंधितांना आदेशित करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १५/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व शिक्यानिशी दिले.

**स्थळ- साकोलो** **तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी,**
**दिनांक- १५/०९/२०२५** **साकोली**

RNI No.- MAHAMAR-2010/35801
महासागर भंडारा
**मालक, मुद्रक, प्रकाशक** -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक**- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८-९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

## जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय घाणीने बरबटले

**गोंदिया** : विविध खेळ स्पर्धांच्या माध्यमातून जिल्ह्यातून उदयोन्मुख खेळाडू निर्माण व्हावे यासाठी शहरात जिल्हा क्रीडा संकूल व कार्यालय स्थापन करण्यात आले. मात्र सध्या हे कार्यालय घाणीने बरबटल्याचे चित्र आहे.

आदिवासीबहुल आणि नक्षलग्रस्त असलेल्या गोंदियाला शासनाचा विषेश निधी मिळतो. जिल्ह्यात विविध खेळ स्पर्धांचे आयोजन करून या स्पर्धेतील खेळाडूंना विभाग, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये नेतृत्व करण्याची संधी मिळते. स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी चांगले प्रशिक्षक आणि प्रशिक्षणाची गरज असते. शासनाच्या धोरणानुसार तालुकास्थळी तालुका क्रीडा संकूल तर जिल्हास्थळी जिल्हा क्रीडा संकूल कार्यान्वित करण्यात आले आहे. यावर कोट्यवधीचा निधी खर्च करून साहित्य, क्रीडांगण तयार करण्यात आले आहे. मात्र, या ठिकाणी अनेक सुविधांचा अभाव पहावयास मिळतो. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे येथे विविध खेळ स्पर्धा घेण्यात येत आहे. तथापि, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय प्रशासन आणि जिल्हा क्रीडा समितीने येथील सुविधांकडे दुर्लक्ष केल्याचे चित्र आहे, यामुळे खेळाडूंना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांच्या कार्यालयाशेजारील परिसर अस्वच्छतेने माखले आहे. प्रसाधनगृह घाणीने बरबटल्याचे चित्र आहे. जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन परिसर व प्रसाधन गृहांची स्वच्छता करणे आवश्यक आहे.

## दृष्टिक्षेप

### जेसीबी पळवून नेली

**गोरेगाव** : म्हसगाव (देवूटोला) तलावातून अवैधरित्या उत्खनन केल्याप्रकरणी जेसीबी जप्त करण्यात आली होती. सदर जेसीबी दोन आरोपींनी चोरून नेली. ही घटना १५ सप्टेंबरची आहे. तहसील कार्यालयाच्या पथकाने अवैध उत्खनन प्रकरणी जेसीबीवर कारवाई करून जप्त केली होती. तसेच जप्त जेसीबी नांदुरूस्त असल्याने त्या ठिकाणीच ठेवली होती. आरोपींनी सदर जेसीबी पळवून नेली. या प्रकरणी भोजराज वाघाडे (२८) रा.चोपा व आकाश येळे (३२) रा.गोवारीटोला या दोघाविरूध्द गोरेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### शासकीय कामात अडथळा

**गोंदिया** : आमगाव तालुक्यातील शिवणी येथे वीज चोरीच्या प्रकरण संदर्भात आरोपीच्या घरी गेले. दरम्यान वीज चोरीचे जोडणी दिसून आल्याने फिर्यादी चित्रफिती करीत असतांना आरोपीने मोबाईल हिसकावून शिवीगाळ केली तसेच शासकीय कामात अळथडा निर्माण केला. फिर्यादीच्या तक्रारीवरून आरोपी विरुद्ध आमगाव पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सविस्तर असे की, तालुक्यातील शिवणी येथे आरोपी आरोपी गोपाल राऊत (४०) हा आपल्या घरी विद्युत चोरीचे कनेक्शन लावून वीज चोरी करीत आहे, अशी गोपणीय माहिती महावितरण मिळाली. दरम्यान फिर्यादी विजू राजाराम राखडे (२९) रा. शिवणटोला ता. आमगाव हा वरिष्ठांसह घटनास्थळी पोहला. दरम्यान आरोपीने वीज चोरीचे कनेक्शन दिसून आल्याने विजू हा मोबाईने व्हिडीयो तयार करीत असतांना आरोपीने त्याचा मोबाईल हिसकावून जमिनी पटकून नुकसान केले तसेच शिवीगाळ करीत शासकीय कामाळात अळथडा निर्माण केला. फिर्यादीच्या तक्रारीवरून आमगाव पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दगड व काठीने मारहाण

**गोंदिया** : नजिकच्या कारंजावरून गोंदियाकडे येणाऱ्या मार्गावर दारूच्या नशेत असणाऱ्या तीन आरोपींनी संगनमत करून दगड, काठी तसेच लाताबुक्क्याने मारून जखमी केल्याची घटना १६ सप्टेंबरची आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून ग्रामीण पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सविस्तर असे की, फियार्दी प्रशांत पुरुषोत्तम चौधरी (२३) रा. कवडी ता.आमगाव हे आपल्या दुचाकी गोंदियाकडे येत असतांना मागून येणाऱ्या चारचाकी वाहन क्र. एमएच.३५/६०२० च्या चालकाने दारूच्या नशेत वाहतूक चालवित जोरजोरात हार्न वाजवित फिर्यादीला शिविगाळ केली. दरम्यान फिर्यादीने आपले वाहन थाबविले त्यातच आरोपींनी सुद्धा आपले वाहन थांबवून चालकाने प्रशांतच्या डोक्यावर दगडाने तर दुसऱ्याने काठीने मारहाण केली. तसेच एकाने थापडबुक्क्याने मारहाण करीत जखमी केले. फिर्यादीच्या तक्रारीवरून व वैद्यकीय अहवालावरून गोंदिया ग्रामीण पोलिसात त्या तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### दुचाकी चोरी

**गोंदिया** : स्थानिक सिव्हील लाईन डॉ. बहेकार दवाखान्याच्या पार्किंगमध्ये ठेवली दुचाकी अज्ञात चोरट्यांनी लंपास केली. फिर्यादी राजेश हरिणखेडे (४१) रा. नगपुरा/कालीमाटी हा रुग्णालयात गेला. दरम्यान त्याने पार्किमध्ये वाहन उभे केले. चोरट्यांनी डाव साधून दुचाकी क्र. एमएच. ३५/एसी. ८५८२ लंपास केली. तक्रारीवरून शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मासुलकसा जिप शाळा इमारतीचे छत कोसळले

## दुपारच्या सुट्टीमुळे जीवितहानी टळली





**प्रतिनिधी / देवरी**

तालुक्यातील मासुलकसा येथील जिल्हा परिषद शाळेचा स्लॅब अचानक कोसळला. ही घटना १८ सप्टेंबरच्या दुपारी २ वाजता सुमारासची आहे. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. परंतु, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आहे. जि.प.शाळांची दुरवस्था होवूनही शासन, प्रशासन जिवाशी खेळत असल्याची प्रतिक्रिया पालकांकडून व्यक्त केली जात आहे.

मासुलकसा येथील जि.प.शाळेची इमारत जीर्ण झाली आहे. या संदर्भात स्थानिक जनप्रतिनिधीसह अधिकाऱ्यांना माहिती देवून नविन इमारतीची मागणी गावकरी व शाळा समितीच्या वतीने अनेकदा करण्यात आली आहे. परंतु, संबधित विभाग याकडे सातत्याने दुर्लक्ष करीत आहे. इमारत जीर्ण झाल्याने गळती लागली होती. अशातच जीर्ण असलेला भाग मागील काही दिवसांपासून कोसळत होता. पर्याय नसल्याने या शाळेत विद्यार्थ्यांना ज्ञानाचे धडे गिरवावे लागत होते. शिवाय शिक्षकांनाही विद्यार्थ्यांसह जीव धोक्यात घालून विद्यादानाचे काम करावे लागत होते. अशातच १८ सप्टेंबर रोजी स्लॅब कोसळला. ही दुपारी २ वाजता सुमारासची आहे. या काळात विद्यार्थ्यांना मध्यांह सुट्टी असल्याने विद्यार्थी वर्गखोलीत हजर नव्हते. यामुळे सुदैवाने मोठे अनर्थ टळले. या घटनेची माहिती मुख्याध्यपकांनी पंचायत समितीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली आहे. शाळेची इमारत जीर्ण झाली असून शाळेच्या इमारतीची दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी कित्येकदा शालेय व्यवस्थापन समिती आणि शिक्षकांनी जिल्हा परिषद शिक्षण विभाग तसेच स्थानिक जनप्रतिनिधीला केली होती. मात्र, त्यानी अद्यापही दखल घेतली नसल्याने, या ठिकाणी मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आतातरी प्रशासन आणि जनप्रतिनिधी याकडे लक्ष देणार का? याकडे लक्ष लागले आहे.

### विकासासाठी येणारा निधी जातो कुठे?

**आदिवासी व नक्षलग्रस्त भागात शासनाकडून अनेक सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात, याकरीता मोठा निधी खर्च केला जातो. परंतु, प्रशासकीय अनास्था आणि संधीसाधू राजकारण्यांमुळे क्षेत्र अद्यापही विकासापासून वंचित आहे. मासुलकसा जि.प.शाळेत १ ते ४ वर्ग असून पटसंख्या ४० आहे. शाळेत दोन शिक्षक नियुक्त असून शिक्षण देण्याचे काम करीत आहेत. शाळेची इमारत जुनी असून कित्येक वर्षापासून विद्यार्थ्यांना जीर्ण इमारतीमध्ये ज्ञानाचे धडे गिरवीत आहेत. ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समितीने स्थानिक लोकप्रतिनिधी व शिक्षण विभागाला अनेकदा या संदर्भात माहिती दिली. पण दुर्लक्ष करण्यात आल्याने विद्यार्थ्यांचे जीव धोक्यात आले आहे. यामुळे पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.**

# प्रहारच्या आगळ्यावेगळ्या आंदोलनाने वेधले लक्ष

## मागण्यांची कात्रणे चिकटवून रोष व्यक्त



**प्रतिनिधी / तिरोडा**

प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने आज (ता.१९) जिल्हाधिकारी कार्यालयात आगळेवेगळे आंदोलन करून जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधले. पोलिस ठाणे, शेती, सिंचन, रेल्वे निवेदने, गाड्या आणि पशु विमा यासह १४ मागण्यांना घेवून आंदोलन करण्यात आले. दरम्यान तालुकाध्यक्ष प्रदिप निशाने यांनी मागण्यांची कात्रणे शरीरावर चिकटवून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. या आंदोलनाची अनोखी पद्धत जिल्हाधिकारी कार्यालयात चचेर्चा विषय बनली होती.

तालुक्यातील मुंडीकोटा येथे पोलिस स्टेशन व ग्रामीण रूग्णालयाची निर्मिती करण्यात यावी, या प्रमुख मागणीसह इतर १४ मागण्यांना घेवून प्रहार पक्षाच्या वतीने आंदोलन करण्यात आले. महिनाभरापूर्वी या संदर्भात जिल्हा व तालुका प्रशासनाला निवेदन देण्यात आले होते. परंतु, निवेदनाकडे दुर्लक्ष करण्यात आले. शासन, प्रशासनाकडून दिरंगाई होत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. मुंडीकोटा मुख्य व केंद्र गाव असूनही मुलभूत सुविधा, लहान-सहान कामांकरीता तिरोडा गाठावे लागत आहे. परिणामी नागरिकांना वेळ व आर्थिक भुर्दड बसत आहे. याकरीता मुंडीकोटा येथे पोलिस स्टेशन व ग्रामीण रूग्णालयाची निर्मिती करण्यात यावी, शेतीला सिंचन सुविधा निर्माण करावी, प्रमुख रेल्वेगाड्यांचे थांबे देण्यात यावे, विमाचा लाभ शेतकऱ्यांना देण्यात यावा, आदि १४ मागण्यांना घेवून प्रहारच्या वतीने आगळवेगळे आंदोलन करण्यात आले. तालुकाध्यक्ष प्रदीप निशाने यांनी १४ मागण्या कागदावर लिहून त्यांची कात्रणे शरीरावर चिकटवून जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर केले. निवेदन सादर करण्याची ही अनोखी पद्धत जिल्हाधिकारी कार्यालयात चचेर्चा विषय बनली आहे.

या आंदोलनात वामन हजारे, धनलाल उके, कमलेश चिंचुकर, विनोद कटवाले, दीपक चामट, सुरेंद्र सूर्यवंशी, चंदू गायधने व इतर कार्यकर्ते उपस्थित होते. आठ दिवसांत मागण्यांचा विचार करण्यात आला नाही तर तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही प्रहार जनशक्ती पक्षाने दिला आहे.

### झाडावरून पडल्याने इसमाचा मृत्यू

**प्रतिनिधी / गोंदिया**

तिरोडा पोलिस ठाण्यांतर्गत लाखेगाव येथे फांद्या कापण्यासाठी झाडावर चढलेल्या इसमाचा पडून मृत्यू झाला. ही घटना १७ सप्टेंबरची आहे. कैलाश सुरजनाथ पटले (३७) रा. लाखेगाव असे मृताचे नाव आहे. मृतक हा शेळ्या घेवून शेतात गेला. दरम्यान तो फांद्या कापण्यासाठी झाडावर चढला. त्यातच वैष्ठलाशचा पाय घसरल्याने तो शेतातील धुऱ्यावर पडल्याने त्याचा मृत्यू झाला. फिर्यादी राजकुमार राघोबा बिंझाडे (४३) रा. लाखेगाव यांच्या तक्रारीवरून पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शेतकऱ्यांच्या खात्यात चुकारे व बोनसची रक्कम होणार जमा



आमदार विनोद अग्रवाल यांच्या पाठपुराव्याला यश

**प्रतिनिधी/ गोंदिया**

गोंदिया जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात खरीप व रब्बी हंगामाता धानाचे उद्धाटन घेतले जाते. त्यातच आधारभूत किंमतीत धान खरेदी अंतर्गत मार्केटिंग फेडरेशनने ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी बीम बॅम सुरूवात केली. मात्र अॅपमध्ये तांत्रिक अडचण येत असल्याने शेतकऱ्यांच्या बँक खात्यात चुकारे व बोनसची रक्कम जमा होत नसल्याने आमदार विनोद अग्रवाल यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेत समस्या लक्षात आणून दिली. दरम्यान तातडीची बैठक घेवून बीम अॅपद्वारे झालेल्या ऑनलाईन नोंदणीतल्या त्रुट्या दूर करून शेतकऱ्यांना लभा द्या तसेच धान खरेदीची लिमिट वाढून झाली ५ लाख ६० हजार क्विंटल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. व वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांच्या ७/१२ च्या आधारे बोनसची थकीत रक्कम ८५ कोटी रुपये तसेच रब्बी धान खरेदीच्या थकलेल्या चुकाऱ्याची रक्कम ८१५ कोटी रुपये, अशी एकूण ९०० कोटी रुपये मंजूर करून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आधारभूत किंमतीत धान खरेदी अंतर्गत मार्केटिंग फेडरेशनने धान खरेदीचे ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी नव्या पद्धतीने बीम अॅप द्वारे सुरुवात केली होती. मात्र या अॅपमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यामुळे अनेक धान उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात धानाचे चुकारे व बोनस रक्कम जमा न झाल्याने आमदार विनोद अग्रवाल यांनी धान उत्पादक शेतकऱ्यांचा विषयाला घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन हा मुद्दा त्यांच्या लक्षात आणून दिला होता. मुख्यमंत्री यांच्या आदेशानंतर तत्काळ एक बैठक घेण्यात आली. दरम्यान बीम अॅपपमुळे शेतकऱ्यांवर झालेला अन्याय दूर करण्यासाठी सकारात्मक चर्चा करून कारवाईचे आदेश देण्यात आले. या आदेशानुसार बीम अॅपद्वारे झालेल्या ऑनलाईन नोंदणीतल्या त्रुटी दूर करून शेतकऱ्यांना लाभ देण्याचे आदेश झाले. तसेच शासन स्तरावर वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांच्या ७/१२ च्या आधारे बोनसची थकीत रक्कम ८५ कोटी रुपये तसेच रब्बी धान खरेदीच्या थकलेल्या चुकाऱ्याची रक्कम ८१५ कोटी, अशी एकूण ९०० कोटी रुपये मंजूर करून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान आमदार विनोद अग्रवाल यांच्या पाठपुराव्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. उल्लेखनी असे की, ही रक्कम लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. व धान उत्पादनाच्या आधारावर लिमिट वाढवण्याच्या मुद्द्यावर सकारात्मक पाऊल उचलून धानाची क्षमता ५ लाख ६० हजार क्विंटल करण्याचा निर्णय घेतला. यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# शाळा हे व्यक्तिमत्व विकासाचे स्थान : लायकराम भेंडारकर



**प्रतिनिधी / गोंदिया**

१८ सप्टेंबर रोजी मौजा सिलेझरी येथे जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्या स्थानिक जिल्हा निधी अंतर्गत बांधकाम करण्यात आलेल्या शाळा प्रवेशद्वाराच्या लोकार्पणाचा सोहळा अतिशय उत्साह आणि आनंदाच्या वातावरणात पार पडला. या शाळेच्या प्रवेशद्वाराचे लोकार्पण जिल्हा परिषद अध्यक्ष यांच्या हस्ते करण्यात आला. शाळेच्या विकासात महत्त्वाचा ठरणारा हा प्रवेशद्वार आता विद्यार्थ्यांसाठी सुरक्षितता आणि सुव्यवस्था देणार आहे, तसेच शाळेच्या परिसराला एक आकर्षक आणि व्यवस्थित स्वरूप प्राप्त करून देणार आहे.

कार्यक्रमात बोलताना लायकराम भेंडारकर अध्यक्ष जिल्हा परिषद यांनी शाळा हे केवळ शिक्षणाचे केंद्र नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाचे स्थान असल्याचे स्पष्ट केले. नव्या प्रवेशद्वारामुळे विद्यार्थ्यांना शाळेबद्दल अधिक अभिमान वाटेल, शाळेची ओळख उठून दिसेल, तसेच गावाची शैक्षणिक संस्कृती बळकट होईल असे मत त्यांनी व्यक्त केले.

या लोकार्पण सोहळ्यास माजी मंत्री तथा आमदार राजकुमार बडोले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासोबत यशवंत गणवीर जि. प. सदस्य, कुमार शहारे उपविभागीय अधिकारी, अनिरुद्ध कांबळे तहसीलदार, लोकपाल गहाणे संचालक कृ. उ. बा. स., लतताई भेंडारकर सरपंच, सुखदेव मेंढे उपसरपंच, सुभाष ब्राह्मणकर से.स. संस्था अध्यक्ष, समीर बनसोड उपविभागीय अभियंता, दिनेश उईके पो.पा., शालुताई मेंढे पो.पा. घुसोबतोला तसेच माजी संचालक वामन ब्राह्मणकर, गणेश ब्राह्मणकर, प्रकाश टेंभुर्णे माजी सरपंच, राजकुमार शहारे, हेमराज महामुर्ते, आसाराम गोपे, सुनिता ब्राह्मणकर, कायाबाई मेश्राम, दर्शना गहाणे, शिल्पा हेमने आणि शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य या मान्यवरांची उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमात शिक्षक-शिक्षिका, विद्यार्थी-विद्यार्थिनी, तसेच गावातील महिला व पुरुष मंडळी मोठ्या संख्येने सहभागी झाले. विशेष म्हणजे महिलांचा उत्स्फूर्त सहभाग कार्यक्रमाची शोभा वाढवणारा ठरला. परिसरात उत्साहाचे वातावरण असून शाळेच्या विकासात आणखी सकारात्मक पावले टाकली जातील अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली

संपूर्ण सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला आणि उपस्थितांनी याप्रसंगी शाळेच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. ग्रामस्थांनीही एकत्र येऊन अशा रचनात्मक उपक्रमांना पुढेही सहकार्य करण्याचा संकल्प केला.

### जीवे मारण्याची धमकी

**गोंदिया** : तालुक्यातील सेजगाव येथे क्षुल्लक कारणावरून शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना १७ सप्टेंबरची आहे. फिर्यादी वीजय रोशनलाल टेभरे (३६) रा. सेजगाव खु. यांच्या घरासमोर येवून आरोपी ऋषीपाल भोजराज उपवंशी याने तू जर माज्या घरासमोर आला तर तुला जीवाने मारून टाकणार, अशी धमकी दिली. तक्रारीवरून गंगाझरी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शेतमजूर युनियनटची तहसीलवर धडक

## शेतमजूर, वनहक्क धारक व पेंशनची समस्या मार्गी लावा




**प्रतिनिधी / गोंदिया**

महाराष्ट्र राज्य लाल बावटा शेतमजूर युनियनच्या वतीने भुमिहिन, शेतमजूर, वनहक्क, वृध्द पेंशन आदि विविध मागण्यांना घेवून आज (ता.१९) गोंदिया व तहसील कार्यालयावर धडक देत आंदोलन करण्यात आले. आंदोलनाच्या माध्यमातून शेतमजूर, वनहक्क धारक, वृध्द पेंशन धारकांच्या समस्यांकडे शासन व सरकारचे लक्ष वेधण्यात आले. प्रलंबित समस्या मार्गी लावण्यात यावे, अशी मागणी तहसीलदारमार्फत शासनाकडे करण्यात आली.

वन हक्क जमीनीचे पट्टे द्या, श्रावण बाळ, वृध्दापकाळ, संजय गांधी निराधार योजना, बीपीएल लाभार्थ्यांना १० तारखेच्या आत थकीत असलेली अर्थसहाय्य देण्यात यावे, मनरेगाची दैनिक मजूरी ६०० रुपए करण्यात यावे, शेतमजूरांना मासिक पेंशन ६ हजार रुपए करण्यात यावे, नवीन रेशन कार्ड मोहीम सुरू करण्यात यावी आदि विविध मागण्यांना घेवून महाराष्ट्र राज्य लाल बावटा शेतमजूर युनियनच्या वतीने १९ सप्टेंबर गोंदिया व गोरेगाव येथे आंदोलन करण्यात आले. गोंदिया येथील प्रशासकीय इमारतीसमोर घोषणाबाजी करून सरकारविरूध्द प्रदर्शन करण्यात आले. आंदोलनाचे नेतृत्व लाल बावटा शेतमजूर युनियनचे जिल्हाध्यक्ष प्रल्हाद उके, भाकपचे जिल्हा सहसचिव परेश दुरुगवार, रामचंद्र पाटील यांनी केले. तहसीलदार शमशेर पठाण यांना मागण्याचे निवेदन सादर करण्यात आले. आंदोलनात जितु गजभिये, सुरेश रंगारी, प्रकाश डहाट, विमला रामटेके, हेमराज खांडेकर, मधुकर नागवंशी व अनेक कर्यकर्ते उपस्थित होते.

गोरेगाव येथे गोरेगांव बसस्थानक येथून तहसील कार्यालयपर्यत मोर्चा काढण्यात आला. मोर्च्याचे नेतृत्व राज्य उपाध्यक्ष हौसलाल रहांगडाले, कल्पना डोंगरे, अशोक मेश्राम, गुणवतराव नाईक, दुलीचंद कावडे यांनी केले. वनजमिनीवर अतिक्रमण करणाऱ्यांना मालकी पट्टे देण्यात यावे, जमीन सोडण्याचे नोटीस मागे घेण्यात यावे, शेतमजुरांना पेंशन लागु करण्यात यावी, मनरेगाची मजुरी ६०० रुपए करण्यात यावी, नवीन रेशन कार्ड बनविण्याची मोहीम सुरू करावी, निराधारांना महिन्याच्या १० तारखेला मानधन देण्यात यावे, आदि विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदार मार्फत राज्य शासनाला देण्यात आले. या आंदोलनात पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येत सहभागी झाले होते.

### घराच्या वादावरून हतौडीने मारून केले जखमी

**गोंदिया** : सडक अर्जुनी तालुक्यातील सौंदड येथे घराच्या वादावरून भांडण करून शिवीगाळ करीत हतौडीने मारून जखमी केले. ही घटना १५ सप्टेंबरच्या रात्रीची आहे. लोकेश गायधने (२७) असे फिर्यादीचे तर जयंता गायधने (२९) असे आरोपीचे नाव आहे. फिर्यादी हा आपल्या घरी असताना त्याचा चुलत भाऊ आरोपी जयंता गायधने हा दारूच्या नशेत हातात हातोडी घेवून आला. तसेच आजीला आमच्या नावावर घर का करून देत नाही, असे बोलून भांडण केले. त्याचबरोबर फिर्यादीसोबत हुज्जत घालून हातोडी मारून जखमी केले. तक्रारीवरून डुग्गीपार पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# भीषण अपघातात वाहनाचा चेंदामेंदा

## चालक थोडक्यात बचावला; पालडोंगरी शिवारातील घटना



**प्रतिनिधी / तिरोडा**

तिरोडा-खैरलांजी मार्गावर वाराशिवनीकडे जात असलेले चारचाकी वाहन अनियंत्रित होवून रस्त्याच्या कडेला उलटला. या भीषण अपघातात वाहनाचा चेंदामेंदा झाला. नशिब बलवत असल्याने चालक थोडक्यात बचावला. ही घटना आज (ता.१९) दुपारी ४ वाजता सुमारास पालडोंगरी-भुराटोला शिवारातील आहे. जितेंद्र गोवर्धन विश्वकर्मा (३८) रा.वारासिवनी (मप्र) असे जखमीचे नाव आहे. जखमीवर ग्रामीण रूग्णालयात उपचार सुरू आहे.

तिरोडा-खैरलांजी मार्गे चारचाकी वाहन क्र.एमपी-५०/सी-७१७२ चा चालक जितेंद्र विश्वकर्मा हा वारासिवनीकडे जात होता. दरम्यान पालडोंगरी-भुराटोला शिवारात भरधाव वाहनावरून चालकाचे नियंत्रण सुटले. अनियंत्रित वाहन रस्त्याच्या कडेला जावून उलटला. या भीषण अपघातात वाहनाने दोन्ही चाक बाहेर पडले तर इंजीन २५ फुट दूर जावून फेकला गेला. या अपघातात नशिबाने चालक जितेंद्र विश्वकर्मा थोडक्यात बचावला. किरकोळ मार लागल्याने त्याला ग्रामीण रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. जखमीची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉ.संजय भगत यांनी दिली. अपघाताची माहिती मिळताच तिरोडा पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला तसेच गुन्हा नोंद करून तपासकार्य सुरू केले आहे.

